| संक्षीप्त फौजदारी खटला क्रं.४०५/२०२५ निशाणी क्रं.१ लगत | MHLA120012472025 |
|---|---|

**फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७४ चा अधिनियम दोन प्रकरण एकविस अन्वये संक्षीप्त संपरिक्षा केलेली**

**ए.एस.गुंजवटे, प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**

**न्यायालय क्रं.२ निलंगा , यांचे न्यायालयात**

१. अपराध घडल्याचा दिनांक – ०५/०२/२०२५

२. अहवालाचा दिनांक – १९/०४/२०२५

३. फिर्यादीचे नांव वय व पत्ता – महाराष्ट सरकारतर्फे पो.स्टे. कासारसिरसी

४. आरोपीचे नांव वय व पत्ता – **नितीन उर्फ खंडु व्यंकट हेबाडे**
वय– ३३ वर्षे, व्यवसाय–मजुरी,
रा.कासारसिरसी, ता. निलंगा, जि.लातूर .

५. आरोपीला समजावून सांगणेचा – मुंबई जुगार प्रतिबंध अधिनियम, १८८७ चे कलम १२ (अ) प्रमाणे.

६. **तपशिल :–**

तुम्ही दिनांक ०५/०२/२०२५ रोजी १५.३० वाजणेचे सुमारास मौजे कासारसिरसी ते उमरगा जाणाऱ्या रोडवर मदीना हॉटेल जवळ तुमच्या स्वतःच्या फायदयाकरीता कल्याण मटका नावाचा जुगार खेळताना मिळून आला. सदरचा गुन्हा या न्यायालयाच्या दखलगिरीत घडला आहे. आरोपीला आरोप वाचून दाखविणेत आला व समजाविणेत आला.

७. **आरोपीचे प्रतिकथन**

प्र. १ तुम्हाला पोलीस पेपर्सच्या नकला मिळाल्या काय ?
उत्तर होय.

प्र. २ दोषारोपातील आरोप तुम्हाला वाचून व समजावून सांगितले ते तुम्हाला समजले काय ?
उत्तर होय.

प्र. ३ तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय?
उत्तर होय, मला गुन्हा कबूल आहे.

दिनांक २८/०४/२०२५

...................

आरोपीची सही

समोर,

Digitally signed by GUNJAVATE APARNA SHIVAJI
Date: 2025.04.29 16:37:04 +0530

(**श्रीमती ए.एस. गुंजवटे**)

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,(न्यायालय क्र.२) निलंगा

आरोपीने सदरचा गुन्हा कबूल केलेला आहे. आरोपीचे शिक्षेबाबत म्हणणे ऐकले. आरोपीने असे कथन केले की, तो त्याच्या कुटुंबातील एकमेव कमवती व्यक्ती आहे व तो दंड भरणेस तयार आहे. तरी त्याला कमीत कमी शिक्षा व्हावी. गुन्हयाचे स्वरुप पाहता खालील प्रमाणे आदेशित केलेली शिक्षा न्यायसंगत दिसून येते.

**<u>आदेश</u>**

**१.** आरोपी **नितीन ऊर्फ खंडु व्यंकट,** याला फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५२ अन्वये मुंबई जुगार प्रतिबंध अधिनियम, १८८७ चे कलम १२ (अ) प्रमाणे केलेल्या अपराधामध्ये दोषी धरणेत येते असून त्यांना सदर गुन्हयाकरीता न्यायालय कामकाजाची वेळ संपेपर्यंत साधा कारावास व **रक्कम रुपये २००/-(रुपये दोनशे फक्त) दंड अशी** शिक्षा सुनावणेत येत आहे. वरील **दंडाची रक्कम न भरल्यास ३ दिवसाची साध्या कारावासाची शिक्षा** सुनावणेत येत आहे.

**२.** प्रस्तुत कामी जप्त असलेला मुद्देमाल रोख रक्कम रू.९८०/- अपील कालावधीनंतर जमा करणेत यावी.

**३.** उर्वरीत मुद्देमाल हा अपील कालावधीनंतर नियमाप्रमाणे नाश करणेत यावा

Digitally signed by GUNJAVATE APARNA SHIVAJI
Date: 2025.04.29 16:37:11 +0530

दि.२८/०४/२०२५

(**श्रीमती ए.एस. गुंजवटे**)

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,(न्यायालय क्र.२) निलंगा